(महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय, भाग-६ अ करिता)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३-अ/१०/जीटी-२४/ {पो.नि., बि.सं. (अभि.)} /२४/२०२४ मुंबई, दिनांक :- २४ /०६/२०२४

वाचा:- १. महाराष्ट्र पोलीस कायदा-१९५१

२. पोलीस आस्थापना मंडळ क्र. २ यांचे दिनांक २४/०६/२०२४ च्या बैठकीचे इतिवृत्त.

## आ दे श

महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ मधील कलम २२ न (२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांनी **विहीत कालावधी पूर्ण न झालेल्या** पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) यांच्या विनंतीचा सांगोपांग विचार करून, विशेष बाब म्हणून त्यांच्या नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे बदलीचा निर्णय घेण्यात आला आहे:-

| अ.क्र. | पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) यांचे नांव | सध्याची नेमणुक | बदलीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | सुनिलकुमार रामलालजी साखरे | नागपुर ग्रामीण ते गडचिरोली बदली आदेशाधीन | नागपूर परिक्षेत्र |
| २. | रामदास देवराम पठारे | वर्धा | ठाणे शहर |

२. संबंधीत घटक प्रमुखांनी या बदली आदेशाची प्रत संबंधीत पोलीस अधिकाऱ्यांना तात्काळ बजावून त्यांना तात्काळ कार्यमुक्त करावे. बदली झालेल्या अधिकाऱ्यांना कार्यमुक्त करताना पर्यायी / बदलीवर येणाऱ्या अधिकाऱ्यांची वाट पाहू नये.

३. मा.न्यायालय / महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण / निवडणूक आयुक्त यांचे आदेशाचा भंग होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

४. बदली आदेशानंतर जे पोलीस अधिकारी रुग्ण निवेदन करतील अथवा गैरहजर राहतील त्यांना स्थित कार्यमुक्त (Stand relieved) करण्यात यावे, व त्यांना कार्यमुक्त केल्याचा आदेश त्यांच्या निवासस्थानी बजावावा.

५. घटक प्रमुखांनी त्यांच्या घटकात हजर झालेल्या पोलीस अधिकाऱ्यांची नावे व त्यांच्या घटकातून बदली ठिकाणी कार्यमुक्त केलेल्या पोलीस अधिकाऱ्यांची नावे हजर झालेल्या / कार्यमुक्त केलेल्या दिनांकासह या कार्यालयास कळवावीत. जे पोलीस अधिकारी बदली ठिकाणी कार्यमुक्त करुनही वेळेत बदलीवर हजर होणार नाहीत, अशा पोलीस अधिकाऱ्यांचा कार्यमुक्त केल्याचा दिनांक या कार्यालयास कळवून त्यांच्याविरुद्ध घटक प्रमुखांनी शिस्तभंगविषयक कार्यवाही तातडीने सुरु करावी. सदरची माहिती या कार्यालयातील लक्षवेध:- कार्यासन क्रमांक ३-अ यांना ई ऑफिस / ई-मेल द्वारे [desk३a.dgoffice@mahapolice.gov.in] पाठवावी.

( संजीव कुमार सिंघल )

अपर पोलीस महासंचालक (आस्थापना),

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचेकरीता.

प्रति,

पोलीस आयुक्त, ठाणे शहर

अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे

विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर
पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण / गडचिरोली / वर्धा
पोलीस अधीक्षक, बि.सं., पुर्व विभाग, नागपूर

**प्रत सविनय सादर,**

अपर मुख्य सचिव (गृह),
गृहविभाग, महाराष्ट्र शासन, २ रा मजला, मुख्य इमारत,
मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ३२.

**प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी:-**

कार्यासन अधिकारी, का. क्र. २, ९, ११, ३६ व ४० (पोमसं कार्यालय).

**प्रत,**

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पोमसं कार्यालय, मुंबई.

२/- यांनी सदरचे आदेश विहित कालावधी पूर्ण न झालेल्या पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश, (अभियांत्रिकी) यांची बदली-२०२४ (Tenure Not Complet Police Inspectors W/L (ENGG.) Transfer-२०२४) या विषयाखाली पोलीस महासंचालक कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर १ महिन्यासाठी उपलब्ध करुन द्यावेत.